दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९५ । मंगळवार २५ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# मोक्कातील फरार आरोपी दोन साथीदारांसह अटकेत

### एलसीबीच्या कारवाईत दोन गावठी कट्टे जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने मोक्कासह ६ गुन्ह्यांतील फरार आरोपी लक्ष्मण उर्फ लखन कासार याला त्याच्या दोन साथीदारांसह ताब्यात घेतले आहे. नगर–पाथर्डी रस्त्यावरील चांदबिबी महालाजवळ काही इसम गावठी कट्टे विक्रीसाठी येणार असल्याची गुप्त माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला. पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन संशयितांना पोलिसांनी पाठलाग करून शिताफीने पकडले.

लक्ष्मण उर्फ लखन बाबासाहेब कासार (वय २९, रा. पाथर्डी), सचिन राजेंद्र खाडे (वय ३०, रा. पाथर्डी) व अनिकेत दिलीप पटारे (वय २२, रा. नेवासा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, दोन जिवंत काडतुसे, विनाक्रमांकाची एक मोटारसायकल आणि तीन मोबाईल असा एकूण दोन लाख २४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल तप्त करण्यात आला आहे.

मुख्य आरोपी लखन कासार हा पिंपरी–चिंचवड येथील मोक्का तसेच पाथर्डी पोलीस ठाण्यातील अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार होता. तसेच त्याला १० जानेवारी २०२५ पासून २ वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. सचिन खाडे हा देखील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावरही गंभीर गुन्हे नोंद आहेत. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खर्डा पोलिसांच्या कारवाईत ४१ लाखांचा गुटखा जप्त

### नाकाबंदी तोडून पळणाऱ्या टेम्पोचा सिनेस्टाईल पाठलाग; ३ आरोपींवर गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खर्डा –** शिर्डी–हैदराबाद राज्य महामार्गाने बेकायदेशीरपणे प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोवर खर्डा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाकाबंदी दरम्यान पोलिसांचा इशारा डावलून भरधाव वेगाने पळून जाणाऱ्या टेम्पोचा पोलीस पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करून तेलंगशी शिवारात तिघांना ताब्यात घेतले.



सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्ज्वलसिंह राजपूत यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली होती की, एका आयशर टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात सुगंधी सुपारी व प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक धाराशिवकडून बीडकडे होणार आहे. या बातमीच्या आधारे खर्डा पोलिसांनी जातेगाव फाटा येथे तातडीने नाकाबंदी लावली. संशयित टेम्पो येताना दिसताच पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला, मात्र चालकाने वाहन न थांबवता बोडच्या दिशेने सुसाट वेगाने पळवले. पोलिसांनी तत्परता दाखवत पाठलाग करून तेलंगशी शिवारात वाहन रोखले. टेम्पोची पाहणी केली असता त्यात ४१ लाख ४१ हजार ४८ रुपये किमतीचा सुगंधी गुटखा व सुपारी, तसेच १० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो असा एकूण

■ पान ४ वर

# डॉ. सुजय विखे पाटील यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती

### प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळतानाच पक्षाने सोपविली नवी जबाबदारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी पक्षाच्या विविध प्रकोष्ठांच्या प्रभारी व सहप्रभारींच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. विखे पाटील यांच्याकडे पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. पक्ष संघटनेच्या कामात विविध स्तरांवर सक्रिय असलेल्या डॉ. विखे पाटील यांच्या कामाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आल्याचे पक्षातील कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी आरोग्य, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने काम केले आहे. प्रदेश उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतरही त्यांनी पक्ष संघटनेच्या कामात सक्रिय सहभाग कायम ठेवला आहे. राज्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवत पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडण्यावर त्यांनी भर दिला आहे. आता आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदाची जबाबदारी मिळाल्याने केंद्र



शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह प्रकोष्ठाचे काम राज्यभर अधिक प्रभावीपणे राबविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटनेच्या कामात डॉ. विखे पाटील यांच्यावर सातत्याने नव्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात आहेत. प्रदेश उपाध्यक्षपदानंतर आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी झालेली ही नियुक्ती पक्ष नेतृत्वाचा त्यांच्यावरील विश्वास अधोरेखित करणारी असल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

# आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश

### १३ कोटी ९ लाख ८८ हजार रुपयांच्या नुकसानभरपाईला शासनाची मंजुरी । कान्हूर पठारपारनेर मंडळातील शेतकऱ्यांसाठी दिलासा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळासह प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे झालेल्या पीक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर कान्हूर पठार व पारनेर सर्कलमधील बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १३ कोटी ९ लाख ८८ हजारांचा निधी मंजूर केला असून, या निर्णयामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शासन ■ पान ४ वर

"शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे हेच माझे कर्तव्य आहे," नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच जिल्हा प्रशासनातील महसूल व कृषी विभागातील सर्व अधिकारी वर्गाचेही मनः पूर्वक आभार असून हा संपूर्ण पाठपुरावा करत असताना मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद आबा पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्यांचे विशेष आभार.

आ. काशिनाथ दाते सर
(विधानसभा सदस्य)

# आश्वासनानंतर पेडगाव ग्रामस्थांचे आमरण उपोषण स्थगित

### अवैध गावठी दारूविक्री बंद करण्यासह वीजपुरवठा आणि ६२ रस्त्याचे काम तातडीने मार्गी लावण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** पेडगाव गावातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर पेडगाव ग्रामस्थांनी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाकडून सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन मिळाल्यानंतर स्थगित करण्यात आले. ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्यांवर संबंधित विभागांकडून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आल्याने सरपंच इरफान पीरजादे आणि ग्रामस्थांनी तूर्तास आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

पेडगाव परिसरात शाळेच्या ५० मीटर परिसरासह गावातील विविध ठिकाणी अवैध गावठी दारूविक्री सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अवैध व्यवसायामुळे गावातील सामाजिक वातावरणावर विपरीत परिणाम होत असून, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे शाळा परिसरासह गावातील अवैध दारूविक्री तातडीने बंद करून संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली होती.

**शाळेच्या परिसरातील अवैध व्यवसायाबाबत चिंता**

शाळेच्या आसपास अवैध दारूविक्रीसारखे प्रकार सुरू असल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर तसेच शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून शाळेच्या ५० मीटर परिसरासह गावातील अवैध दारूविक्रीच्या ठिकाणी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. केवळ अधूनमधून कारवाई न करता अवैध दारूविक्रीचा व्यवसाय कायमस्वरूपी बंद होण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. संबंधित ठिकाणी धाडी टाकून दोषींवर गुन्हे दाखल करावेत आणि गावातील सामाजिक वातावरण सुरक्षित ठेवण्यासाठी नियमितपणे कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.

**अनेक वाड्या–वस्त्यांमध्ये वीजपुरवठ्याचा प्रश्न** ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### विद्यार्थ्यांना पोस्को कायद्याबाबत मार्गदर्शन



पाथर्डी - बालकांवरील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती मिळावी, या उद्देशाने मदत सोशल फाउंडेशनच्या अंतर्गत पोस्को अँक्ट २०१२ संदर्भात जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.समाजसेविका अँड. मोनाश्री अहिरे (शिंदे) यांनी संत तुकाराम माध्यमिक आश्रमशाळा, आल्हणवाडी (ता. पाथर्डी) तसेच न्यू इंग्लिश स्कूल, पाथर्डी येथील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकांवरील लैंगिक अत्याचाराची विविध रूपे, पोस्को कायद्यातील तरतुदी, बालकांचे कायदेशीर हक्क, सुरक्षित वर्तन तसेच कोणतीही अनुचित घटना घडल्यास विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनीही या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बालकांच्या सुरक्षिततेसाठी पालक, शिक्षक आणि समाजाने सजग राहणे आवश्यक असून, मुलांना भीती न बाळगता आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठविण्यासाठी सक्षम करणे गरजेचे असल्याचे अँड. मोनाश्री अहिरे यांनी सांगितले.यावेळी शाळेचे पदाधिकारी, मदत सोशल फाउंडेशनचे कार्यवाहक श्रीधर शेलार तसेच अँड. शितल डमाळे उपस्थित होते.

### वंदे मातरम् सहा कडव्यांच्या शासकीय सक्तीविरोधात २८ ऑगस्टला ‘तिरंगा धारणालय सत्याग्रह’



अहिल्यानगर- राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम’च्या पहिल्या दोन सर्वसमावेशक कडव्यांऐवजी संपूर्ण सहा कडव्यांना अधिकृत शासकीय स्वरूप देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ‘तिरंगा धारणालय सत्याग्रह’ करण्यात येणार आहे. ‘‘हे आंदोलन ‘वंदे मातरम’च्या विरोधात नाही, तर स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या गीताचा गौरवशाली, सर्वधर्मसमभावी आणि सर्व भारतीयांना जोडणारा राष्ट्रीय आत्मा जपण्यासाठी आहे,’’ अशी भूमिका आयोजकांनी स्पष्ट केली आहे. केंद्र सरकारच्या २०२६ मधील अधिकृत निर्देशांमध्ये ‘वंदे मातरम’ची सहाही कडवी समाविष्ट करण्यात आल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. पहिल्या दोन कडव्यांमध्ये भारतभूमीचे पाणी, शेती, निसर्गसौंदर्य, समृद्धी आणि मातृप्रेम यांचे सार्वत्रिक चित्रण आहे. मात्र पुढील कडव्यांमध्ये दुर्गा, कमला, वाणी तसेच मंदिरातील प्रतिमांसारखे विशिष्ट धार्मिक संदर्भ येतात. संपूर्ण रचनेचा साहित्यिक व सांस्कृतिक वारसा म्हणून आदर राखत असतानाच, या धार्मिक प्रतिमांना शासकीय राष्ट्रीय विधीचा सक्तीचा भाग बनविणे हे धर्मनिरपेक्षता, विवेकस्वातंत्र्य आणि समान नागरिकत्वाच्या घटनात्मक मूल्यांशी विसंगत असल्याची आंदोलकांची भूमिका आहे.

### प्रकाश सावंत यांचे निधन



अहिल्यानगर- शहरातील भवानीनगर भागातील प्रकाश गोविंदराव सावंत (वय ६७ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. भुसार मार्केट मधील मे. राजळे अँण्ड सावंत कंपनीचे संचालक होते. त्यांच्या निधनाने सावंत परिवारात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, दोन पुतणे, जावाई, नांतवडे असा मोठा परिवार आहे. ते भुषण सावंत यांचे वडील व प्रशांत सावंत यांचे चुलते होते.

# नाथांच्या दर्शनासाठी पैठणमध्ये भाविकांचा जनसागर

**भागवत एकादशीनिमित्त नाथ मंदिर परिसर भक्तिमय; गोदावरी घाटावरही मोठी गर्दी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भागवत एकादशीनिमित्त सोमवारी श्री संत एकनाथ महाराजांच्या दर्शनासाठी पैठणमध्ये भाविकांची मोठी गर्दी उसळली. पहाटेपासूनच भाविकांनी पवित्र गोदावरी नदीत स्नान करून नाथ महाराजांच्या समाधी मंदिराकडे दर्शनासाठी गर्दी केली. दिवसभर मंदिर परिसरात वारकरी, दिंड्या आणि भाविकांची वर्दळ राहिल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

तालुक्यासह परिसरातील विविध गावांमधून वारकरी दिंड्या टाळ–मृदंगाच्या गजरात पैठणमध्ये दाखल झाल्या. हरिनामाचा जयघोष, भगव्या पताका आणि अभंगांच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. ‘ज्ञानोबा–तुकाराम’ तसेच ‘भागवत–एकादशी’च्या जयघोषात भाविकांनी नाथ महाराजांचे दर्शन घेतले.

**गोदावरी घाटावर गर्दी**



पवित्र गोदावरी नदीत स्नान करण्यासाठी पहाटेपासूनच भाविकांची गर्दी झाली होती. गोदावरी घाटापासून नाथ समाधी मंदिरापर्यंत दिवसभर भाविकांची वर्दळ सुरू होती. मंदिर संस्थान आणि प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

**दिंड्यांनी वाढविला उत्साह**

भागवत एकादशीनिमित्त विविध गावांमधून आलेल्या वारकरी दिंड्यांनी पैठणमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण केले. टाळ–मृदंगाच्या निनादात दिंड्यांचे मंदिर परिसरात आगमन झाले. वारकऱ्यांनी नाथ महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले.

**साडेतीन क्विंटल खिचडीचा प्रसाद**

नाथ संस्थानच्या वतीने भाविकांसाठी साडेतीन क्विंटल साबुदाणा खिचडी आणि सुमारे ३० किलो फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

**पोलिसांचा चोख बंदोबस्त**

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता गोदावरी घाट, नाथ मंदिर परिसर आणि प्रमुख मार्गांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गर्दीचे नियोजन करून भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात आले.



राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार प्रदान करताना , सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित,संमेलनाध्यक्ष दादासाहेब धायगुडे, राजेंद्र फंड ,विलास पाटील, शंकर अंदानी आणि माया नवथर इत्यादी मान्यवर.

## माणसे भिंगातून..कथासंग्रहास राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्काराने सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के एस आय पब्लिकेशन्स कोल्हापूर यांचे वे३० राज्यस्तरीय साहित्य संमेलन रविवार दिनांक २३ ऑगस्ट २६ रोजी, आळंदी येथे संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष पदी ज्येष्ठ साहित्यिक कवी दशरथ धायगुडे हे होते. संमेलनाचे निमंत्रक विलास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक शंकर अंदानी, प्रमुख पाहुणे माया नवथर, साहित्यिक राजेंद्र फंड हे व्यासपीठावर विराजमान होते. संमेलन मध्ये व्याख्यान, कथाकथन, कवी संमेलन, पुरस्कार वितरण इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले. सदर संमेलनमध्ये अहिल्यानगर मधील कथा लेखक बाळासाहेब देशमुख यांच्या माणसे भिंगातून...या कथासंग्रहास.. राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार संमेलनाध्यक्ष दादासाहेब धायगुडे, सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित,ज्येष्ठ साहित्यिक शंकर अंदानी, विलास पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

बाळासाहेब देशमुख यांचे आजवर, रंग माझा वेगळा ,माणसे अशी.. अन् तशीही.. , माणसे भिंगातून..इत्यादीकथासंग्रहप्रसिद्धझालेलेआहेत. माणसे भिंगातून... कथासंग्रहास सुप्रसिद्ध साहित्यिक रंगनाथ वाडेकर, उपसंपादक संदीप जाधव यांची प्रस्तावना लाभलेली आहे. सदर कथासंग्रहाचे प्रकाशन २८ वे कवी सरकार राज्यस्तरीय साहित्य संमेलनमध्ये ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र फंड , व्याख्यात्या माया नवथर यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते.कथासंग्रास मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल साहित्यिक श्री सुनील गोसावी,श्री सदानंद भणगे, इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ , बाबुराव उपाध्ये,ज्येष्ठ कादंबरीकार दिलीप कापसे, ज्येष्ठ कवी रूपचंद शिदोरे , डॉक्टर बाळासाहेब कोठुळे , ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ वाडेकर , शर्मिला गोसावी यांनी बाळासाहेब देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

## पाण्याअभावी सरकी पिके सुकण्याच्या मार्गावर; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील सरकी पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील बालानगर, आडुळ, पारुडी, पाचोड, दावरवाडी परिसरातील अनेक शेतांमध्ये पाण्याअभावी सरकीची पिके कोमेजून सुकण्याच्या मार्गावर आहेत. उभ्या पिकांची अवस्था पाहून शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

यंदा सुरुवातीला झालेल्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी सरकीची पेरणी केली. पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली आणि सुरुवातीच्या काळात पिकांची वाढही समाधानकारक होती. मात्र, त्यानंतर पावसाने मोठी उघडीप दिल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी सरकीची पाने कोमेजत असून



अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे.

विशेषतः हलक्या जमिनीतील पिकांची परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज असून, पुढील काही दिवसांत दमदार पाऊस झाला नाही तर उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आधीच वाढता उत्पादन खर्च, बियाणे, खत, औषधांच्या वाढलेल्या किमती यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना पिकांचे नुकसान झाल्यास दुहेरी संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

**पावसाची प्रतीक्षा कायम**

सरकी पिकाला सध्या पावसाची अत्यंत आवश्यकता आहे. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. वेळेत पाऊस न झाल्यास सरकीसह अन्य खरीप पिकांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, संबंधित कृषी विभागाने तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पिकांच्या परिस्थितीचा आढावा घ्यावा, तसेच शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व शासनाच्या नियमानुसार मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# विद्यार्थ्यांनी बालवयातच क्रीडा स्पर्धेचे धडे घ्यावेत - आमदार संग्राम जगताप

**राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी!**
**१९ खेळाडूंना सुवर्णपदक, एका खेळाडूला रौप्यपदक; २० खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य कुस्ती संघटनेच्या वतीने अहिल्यानगर येथील वाडिया पार्क क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेत नगर शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. विविध वजन गटांमध्ये तब्बल १९ खेळाडूंनी सुवर्णपदक, तर एका खेळाडूने रौप्यपदक पटकावले. या गुणवंत खेळाडूंचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर नगर शहरातील विविध वजन गटांमधील २० खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येत्या ५ व ६ सप्टेंबर रोजी पंजाबमधील लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार असून, या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना मान्यवरांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रशिक्षक प्रा. संजय धोपावकर, प्रा. माणिक विधाते, पैलवान अनिल वाणे, आदित्य धोपावकर, शुभम दातरंगे, युवराज करंजुले, गोरख खंडागळे, अथर्व नरसाळे, निलेश मदने, प्रकाश बल्लाळ आदींसह खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बालवयातच शालेय शिक्षण घेत असतानाच आपल्या आवडीच्या क्रीडा स्पर्धांचे धडे घ्यावेत. क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या विविध संधी आज उपलब्ध आहेत. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर खेळाडूंना यश संपादन करता येते.

अहिल्यानगर शहरात सारसनगर तसेच गंगा उद्यान येथे क्रीडा संकुले उभारण्यात आली असून, या ठिकाणी खेळाडूंच्या कलागुणांना वाव देण्याचे काम करता येईल. चांगले प्रशिक्षक मिळाल्यास चांगले खेळाडू घडू शकतात. प्राध्यापक संजय धोपावकर यांनी कुराश कुस्तीच्या माध्यमातून अनेक खेळाडू निर्माण करण्याचे काम केले आहे, असे त्यांनी सांगितले.

खेळाच्या माध्यमातून शरीराचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होते. मात्र दिवसेंदिवस मैदानी खेळ कमी होत चालले आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मैदानी खेळांकडे वळविणे गरजेचे असून, त्यांना दर्जेदार मैदान आणि चांगले प्रशिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्पर्धांच्या माध्यमातूनच खेळाडू घडत असतात, असे आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी सांगितले.

प्रशिक्षक प्रा. संजय धोपावकर म्हणाले की, अहिल्यानगर शहरात राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध वजन गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २० खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. येत्या ५ व ६ सप्टेंबर रोजी पंजाबमधील लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार आहे.

खेळाडूंना योग्य मार्गदर्शन आणि सरावासाठी आवश्यक सुविधा मिळाल्यास ते निश्चितपणे यश संपादन करू शकतात. खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार संग्राम जगताप हे नेहमीच प्रयत्नशील असतात, असे प्रा. संजय दत्त यांनी सांगितले.

यावेळी विविध गटांमध्ये सुवर्णपदक पटकावलेल्या वेद अरकल, विहान उदगीरकर, श्लोक सब्बन, पार्थ दातरंगे, मल्हार सुरसे, शिवतेज खंडागळे, विराट करंजुले, सम्राट करंजुले, ओम प्रकाश दहिफळे, ओम पोकळे, अन्वी अंदे, आर्या शिंदे, आरोही लखापती, स्वरा डहाळे, आराध्या बल्लाळ, ऋचा बोगा, सिद्धी दातरंगे, अनुज बोगा आणि युवराज आव्हाड यांचा सत्कार करण्यात आला.

## ट्रकला आयशरची पाठीमागून जोरदार धडक; चालकाचा मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील मुरमा परिसरात सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर आयशर ट्रकने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. सोमवारी (दि. २४) मध्यरात्री दोनच्या सुमारास झालेल्या या अपघातात आयशर चालक असिफ मेहबूब बेग (३०, रा. बसवंतनगर, लातूर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मुरमा गावाजवळ समोरील ट्रक अचानक थांबल्याने आयशर चालकाचा अंदाज चुकला आणि वाहनाची जोरदार धडक झाली. अपघातात असिफ बेग गंभीर जखमी झाले होते. त्यांना छत्रपती





संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## जैन ओसवाल पतसंस्थेच्या नूतन संचालकांचा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन ओसवाल नागरी पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद आहे. पतसंस्थेसाठी क्रियाशील संचालकांची निवड करणे ही मोठी जबाबदारी असते. नवनिर्वाचीत संचालक श्रीकांत भागवत यांचे आर्थिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे.अमित भांड आणि त्यांचा परिवार गेल्या ३५ वर्षांपासून पतसंस्थेशी जोडला गेला आहे. तसेच बोगावत परिवारालाही आर्थिक क्षेत्राचा चांगला अनुभव आहे.नूतन संचालकांची झालेली निवड योग्यच आहे.गेल्या पंचवीस वर्षापासून संस्थेने अनेक चढ–उतार पाहिले आहे. संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठी संचालक मंडळ विश्वासाने कार्य करीत आहे. संचालक मंडळांने केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळेच जैन ओसवाल नागरी पतसंस्थेचे प्रगती झाली आहे.असे प्रतिपादन जैन ओसवाल पंचायतचे अध्यक्ष व आय लव नगरचे संस्थापक उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या रिक्त जागांवर निवड झालेल्या नूतन संचालकांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. जैन ओसवाल पंचायतचे अध्यक्ष व आय लव नगरचे संस्थापक उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते नवनिर्वाचित संचालक अमित भांड, तेजस्विनी बोगावत,श्रीकांत भागवत यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे,व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी,समीर बोरा,चेतन भंडारी,विनीत बोरा,शरद गोयल,व्यवस्थापक प्रशांत भंडारी यांच्यासह प्रमोद डागा, प्रतीक बोगावत,अभिजीत भांड,सारिका भांड,जीतांशु भांड,रुपेश नायर,परेश भाटे,चिराग शेटीया,दिव्या बोगावत आदी उपस्थित होते.

प्रास्तविकात संतोष गांधी म्हणाले, ‘‘सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी स्थापन केलेल्या पतसंस्थेला उत्कृष्ट आर्थिक कारभाराची मोठी परंपरा आहे.यात संचालकांचे मोठे योगदान आहे.रिक्त जागांवर बिनविरोध निवड झालेले तीनही संचालक हीच परंपरा पुढे चालवत पतसंस्थेच्या प्रगतीत आपले योगदान देतील.असा विश्वास आहे. संधी देण्यात आलेले तिन्ही संचालक आर्थिक क्षेत्राचे जाणकार आहेत.त्यामुळे संस्थेला येत्या काळात यशाची शिखरे पार करण्यासाठी जुन्या सर्वच संचालकांसमवेत या तिन्ही नवनिर्वाचित संचालकांचे मोलाचे योगदान लाभेल.

मनोगत व्यक्त करतांना म्हणाले व्हाइस चेअरमन शैलेश गांधी म्हणाले,आपली पतसंस्था ही जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात आपले स्थान मजबूत करत आहे. लवकरच २०० कोटी ठेवींचा टप्पा गाठण्याचे उद्दीष्ट सोबत घेऊन संचालकांनी जोमाने कामाला सुरुवात केली आहे.संस्था मोठमोठ्या बँकेच्या बरोबरीने सेवा देत असून अल्पदरात कर्ज उपलब्ध करून व्यवसायांना पाठबळ देत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (✻ पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### पतसंस्थाच्या प्रगतीत कर्मचाऱ्यांनी भूमिका महत्त्वाची: किशोर गांधी



**अहिल्यानगर- पतसंस्था किंवा कोणत्याही सहकारी आर्थिक संस्थेत कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची व आवश्यक असते. त्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्याने त्यांची कार्यक्षमता वाढते तसेच त्यांची व पतसंस्थेची व्यावसायिकता वाढते, असे प्रतिपादन सहकारी बँकिंगमधील अनुभवी अधिकारी किशोर गांधी यांनी केले.पाथर्डी तालुक्यातील मोहटादेवी देवस्थानच्या भक्त निवासात पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील पतसंस्थांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित एक दिवसीय प्रशिक्षण बोलताना त्यांनी पतसंस्थेचे संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या भागिदारी विषयी विचार मांडले.नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुक्यात प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. पारनेर, कर्जत, जामखेड, संगमनेर येथील प्रशिक्षण शिबिरे उत्साहात पार पडली.  पतसंस्था चळवळीचे नेते वसंत लोढा यांनी पतसंस्था चालवताना येणाऱ्या अडचणी व अनुभवांचा उहापोह करताना ही चळवळ फेडरेशनच्या माध्यमातून अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. पतसंस्था चळवळीतील ज्येष्ठ महर्षी काकासाहेब कोयटे यांनी अनुभव संपन्न विचार मांडताना आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध तरतुदी, भविष्यातील योजनांचा सविस्तर आढावा घेतला. आ. मोनिकाताई राजळे यांनी जिल्हा बँकेच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा सहकारी बँक व शासनाद्वारे प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. अर्थतज्ज्ञ प्रशांत भालेराव यांनी कर्मचाऱ्यांच्या कौशल्यावर त्यांना प्रशिक्षण व प्रमोशन दिले जात असल्याचे सांगितले.**

### समता सैनिक दल हे काळाची गरज; गाव तेथे शाखा



**अहिल्यानगर - भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण प्रणित शहर व तालुका शाखेच्या वतीने जिल्हा शाखेच्या आदेशानुसार समता सैनिक मेळावा नालंदा बुद्ध विहार, अहिल्यानगर येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आद. भगवंतराव गायकवाड होते. मेळाव्यात समता सैनिक दलाच्या कार्यासंदर्भात विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन समता सैनिक दलाचे सहउपाध्यक्ष आद. अमोल नाथा गायकवाड यांनी केले. यावेळी आद. लक्ष्मण माघाडे, आद. प्रकाश कांबळे, आद. दीपक अमृत, आद. गोरख केदारे व आद. किशोर कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आद. गोरख केदारे व आद. दीपक अमृत यांनी समता सैनिक दलाच्या गरजू सैनिकांना प्रत्येकी पाच गणवेश देण्याची घोषणा केली. तसेच संरक्षण उपाध्यक्ष आद. संतोष गायकवाड यांनी सैनिकांना पाच जोड बूट, तर तालुका कोषाध्यक्ष आद. सुभाष कांबळे यांनी पाच सैनिकी टोप्या देण्याचे जाहीर केले. या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी देणगीदारांचे कौतुक केले. जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सेक्रेटरी सतीशजी ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हूसळे, कार्यालयीन सचिव गौतम पाचारणे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गायकवाड, जिल्हा सचिव गोरख केदारे व सहसचिव किशोर कांबळे यांनी उपस्थितांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.**

# जनता आता बोलायला लागली...!

जेन–झी च्या आंदोलनानंतर भाजप सरकार विरोधात सुप्त असणारा आवाज आज समाज माध्यमांच्या माध्यमातून समाज घटक आता व्यक्त करू लागले आहेत. जेन–झी जी च्या आंदोलनाला लाभलेला प्रतिसाद आणि त्यामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेला राजीनामा याचे बोलके उदाहरण आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांपासून ते थेट न्यायव्यवस्थेच्या न्यायाधीशापर्यंतचे व्यक्ती आता आपले मत व्यक्त करू लागले आहेत. बोलणारा प्रत्येक व्यक्ती हा विरोधकांचा बोलवता धनी नसून समाज मनातील अस्वस्थता आता बाहेर पडू लागली आहे. केंद्रीय भाजप सरकारच्या पहिल्या दोन टर्ममध्ये भरभरून प्रतिसाद देणारा मतदार आता मात्र आपला आक्रोश मांडू लागला आहे. आता खऱ्या अर्थाने सत्तेच्या दालनातून जनतेच्या मनात डोकवण्याची वेळ आली आहे.

लोकशाहीमध्ये जनता ही अंतिम शक्ती असते. निवडणुकीच्या वेळी मतदान करून सरकार निवडणे ही लोकशाहीचा एक भाग आहे : मात्र सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांच्या कामकाजावर प्रश्न विचारणे, अपेक्षा व्यक्त करणे, किंवा नाराजी मांडणे हे देखील लोकशाहीचा तितकाच महत्त्वाचा भाग आहे. गेल्या काही दिवसात देशातील विविध समाज घटक केंद्रातील भाजप सरकारच्या धोरणाविषयी निर्णय व अंमलबजावणी विषयी आपले मत मांडू लागले आहेत. या बदलत्या जनतेच्या मनोवृत्ती चे आकलन भाजपने वेळेत करून घेणे गरजेचे आहे.

जनतेच्या अपेक्षा आणि वास्तव यामध्ये अंतर वाढले की प्रश्न निर्माण होतात. असे अनेक प्रश्न आणि निर्माण झालेली परिस्थिती जनतेच्या आवाजाचे कारण ठरले आहे.

**१) परीक्षा पद्धतीतील गोंधळ**

नीट व सीबीएससी अंतर्गत होणाऱ्या परीक्षा पद्धतीमध्ये झालेल्या गोंधळामुळे जेनझी च्या लढ्याला बळ मिळाले. सातत्याने परीक्षा व्यवस्थित होणारी गडबड, पेपर फुटी, गुणांकनां मधली तफावत यामुळे तरुणाईने हा मुद्दा महत्त्वाचा करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत.

**२) वादग्रस्त विधान**

जबाबदार पदावर न्यायालयीन व्यवस्थित काम करणाऱ्या व्यक्तीच्या मुखातून काही शब्द बाहेर पडले. तेच शब्द कॉक्रोज जनता पार्टीच्या उदयाला कारणीभूत ठरले. त्यातून तरुणाई संघटित झाली आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा व शिक्षण मंत्री यांच्या राजीनाम्यासाठी जंतरमंतर वरील आंदोलनासाठी पूरक ठरली.

**३) जेन – झी**

माहिती तंत्रज्ञानाशी जोडली गेलेली तरुणाई खऱ्या अर्थानं रोजगाराच्या संधी मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे व अनियमित होणाऱ्या परीक्षेमुळे हैराण झाले आहे. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आता त्यांना कॉक्रोज जनता पार्टीचे व्यासपीठ मिळाले आहे.

**४) दानपेटीतील चोरी**

अयोध्यातील श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील कथित चोरी आणि गैरव्यवहार करण्यात आला आहे. मंदिरातील दान रकमेची मोजणी होत असताना कथितरित्या पैसे लपवून नेल्याची सीसीटीव्ही फुटेज मध्ये आढळल्याचे दिसून आले आहे. यामुळे देवालय सुद्धा सुरक्षित नसल्याची भावना जनमानसात तयार झाली आहे.

**५ ) हिंदुत्वाचा अतिरेक**

धर्मावर श्रद्धा ठेवणे आणि त्या श्रद्धेच्या नावाखाली इतरांविषयी द्वेष करणे हे खऱ्या हिंदुत्वाला अभिप्रेत नाही. धर्माच्या नावाने होणारी असहिष्णुता, द्वेष, राजकीय ध्रुवीकरण आणि कायद्यापेक्षा धार्मिक किंवा समूह भावनेला वरचढ मानण्याच्या प्रवृत्तीचा चिकित्सिक वृत्तीने पडताळणी करण्याची गरज आता खऱ्या अर्थाने निर्माण झाली आहे.



**शरद दारकुंडे सर**
ग्रामीण राजकीय अभ्यासक तथा राजकीय विश्लेषक
९७६४७ ९५२२५

**६ ) इथेनॉल**

आज सर्वच ठिकाणच्या पेट्रोल पंपावरती २०% इथेनॉल मिश्रित पेट्रोल मिळत असलेले पाहायला भेटते.त्यामुळे गाडीचे मायलेजच्या प्रमाण घट झाली आहे. इथेनॉलमुळे रबर सील, गॅस्केट, इंधन प्रणाली साहित्यांची झीज होऊ लागली आहे. इंजिनामध्ये बिघाड होऊ लागला आहे. अशा अनेक वाहन चालकांच्या तक्रारी रोज वर्तमानपत्रातून वाचकाच्या वाचनात येत आहेत.

**७) साखर**

लाडक्या बहिणीला दररोजच्या दैनंदिन जीवनामध्ये आवश्यक असणारी जीवनश्यक वस्तू म्हणून साखरेला महत्त्वाचे स्थान आहे. परंतु इथेनॉलच्या निर्मितीसाठी उसाच्या साखरेच्या मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्यामुळे साखरेची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे काल बाजारात मिळणारी साखर४५ रुपये किमतीवरून ७५ रुपये पर्यंत वाढलेली दिसून येते आहे.

वरील सर्व घटकांचा व कारणांचा विचार केला तर खऱ्या अर्थानं आज जनता आपले मत स्पष्टपणे मांडू लागली आहे. सर्वसामान्य व्यक्तीपासून ते न्याय व्यवस्थेच्या न्यायधीश पर्यंत सर्वच जण आता व्यक्त होऊ लागले आहेत. प्रत्येक नागरिक सरकार विरोधात आहे असे होत नाही. याचा अर्थ एवढाच आहे की, नागरिक आता प्रश्न विचारात आहेत, कामाचा हिशोब मागत आहेत, आणि आश्वासनापेक्षा प्रत्यक्ष परिणाम पाहत आहेत. हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. शेवटी सत्ता जनतेचे आहे आणि सरकार हे जनतेला उत्तरदायी असते. जनतेचा आवाज दाबण्याऐवजी तो ऐकणे, प्रश्नांना उत्तर देणे आणि कामगिरीतून विश्वास निर्माण करणे हीच खरी राजकीय कसोटी आहे. सरकारने आता जनतेच्या आणि जेनझी च्या टीकेकडे विरोधक म्हणून न पाहता जनतेच्या प्रश्नाकडे आत्मपरीक्षणाचे संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे.

## प्रा. लक्ष्मण कोठावळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त श्री ढोकेश्वर कॉलेजमध्ये सेवापूर्ती गौरव समारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत असलेले सहकारी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख मा. प्रा. लक्ष्मण भिकाजी कोठावळे यांच्या सेवापूर्ती निमित्त शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सीताराम विठ्ठलराव खिलारी भूषविणार असून प्रमुख शुभहस्ते ह.भ.प. मा.



डॉ. विकासानंदजी महाराज मिसाळ यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रामचंद्र हरीभाऊ दरे साहेब यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. डॉ. विवेक प्रभाकर भापकर, सचिव मा. श्री. विश्वासराव दत्तात्रय आठरे पाटील, सहसचिव मा. श्री. मुकेश माधवराव मुळे, खजिनदार मा. ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रा. लक्ष्मण कोथावळे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, सेवकवर्ग, आजी–माजी विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच हितचिंतक यांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले असून प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव श्रीधर मतकर यांनी सर्वांना या सेवापूर्ती गौरव समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## भक्तिरसाने रंगला ‘नवविध भक्ती आणि मधुरा भक्ती’चा नृत्याविष्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नृत्य दर्पण नृत्य अकादमी प्रस्तुत ‘नवविध भक्ती आणि मधुरा भक्ती’ हा भक्तिरसाने न्हाऊन निघालेला नृत्याविष्कार माऊली सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भक्ती, प्रेम, समर्पण आणि आत्मनिवेदनाचे विविध भाव विद्यार्थिनींनी नृत्याच्या माध्यमातून प्रभावीपणे साकारले.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलारंभ, गणेश वंदना, सरस्वती वंदना आणि नटराज वंदनेने झाली. त्यानंतर मधुरा भक्तीवर आधारित विविध नृत्यरचना सादर करण्यात आल्या. विविध परीक्षा स्तरांतील विद्यार्थिनींनी या नृत्यरचनांमध्ये सहभाग घेत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

यानंतर नवविध भक्तीचा विशेष नृत्याविष्कार सादर करण्यात आला. श्रवण भक्ती, कीर्तन भक्ती, स्मरण भक्ती, पादसेवन भक्ती, अर्चन भक्ती, वंदन भक्ती, दास्य भक्ती, सख्य भक्ती आणि आत्मनिवेदन भक्ती या भक्तीच्या नऊ प्रकारांचे नृत्य, अभिनय आणि भावमुद्रांच्या माध्यमातून सुरेख दर्शन घडले.श्रीकृष्णावरील प्रेम आणि भक्तीचा भाव व्यक्त करणारी मधुरा भक्ती, तसेच परमेश्वराशी विविध भावबंधातून एकरूप होण्याची अनुभूती देणारी नवविध भक्ती यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. प्रत्येक नृत्यरचनेत भाव, ताल, लय आणि अभिनय यांचा सुरेख मेळ साधण्यात आला.कार्यक्रमादरम्यान अकादमीच्या विद्यार्थिनींच्या परीक्षा यशाचाही गौरव करण्यात आला. यावर्षी झालेल्या परीक्षांमध्ये विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. विशेषतः पाचव्या परीक्षेतील सर्व विद्यार्थिनींनी उत्तीर्ण होत यशाची परंपरा कायम ठेवली, याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## गरजू रुग्णांसाठी आनंदऋषी हॉस्पिटल ठरतेय आरोग्यसेवेचा विश्वासू आधार - मानकचंद कटारिया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य विविध मोफत रोग तपासणी शिबिरामध्ये इंडो युरॉलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) तसेच स्टोन शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन आयोजक मानकचंद संज्जनबाई कटारिया यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी श्री मानकचंदजी कटारिया, रेडिओलॉजिस्ट डॉ. मितेश कटारिया, डॉ. निखिता कटारिया, डॉ. अजित दरंदले, डॉ. अमेय सांगळे, डॉ. संकेत काळपांडे, डॉ. वसंत कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, सतीश लोढा आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना आयोजक मानकचंद कटारिया म्हणाले की, ‘‘आरोग्य ही प्रत्येकाची मूलभूत गरज असून आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा आनंदऋषी हॉस्पिटलच्या सेवाकार्याचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हावी, यासाठी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने विविध आरोग्य उपक्रम राबविले जात आहेत. एखाद्या रुग्णाला वेळेवर योग्य निदान आणि उपचार मिळाल्याने त्याचे जीवन अधिक सुखकर होऊ शकते. गेल्या ३० वर्षांपासून मी आनंदरुषी हॉस्पिटल ची सेवा करताना मला मनस्वी आनंद होत आहे.त्यामुळे आरोग्यसेवेचे हे कार्य केवळ वैद्यकीय सेवा नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे,’’ असे त्यांनी सांगितले.

डॉ. निखिता कटारिया म्हणाल्या की, ‘‘आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध माध्यमातून रुग्णसेवा केली जात आहे. आर्थिक परिस्थिती उपचारांच्या आड येऊ नये, यासाठी परवडणाऱ्या दरात तसेच गरजेनुसार मोफत उपचार देण्याचा आमचा प्रयत्न असतो. आमच्या सासऱ्यांनी गेल्या तीस वर्षांपासून सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य केले आहे. त्यांच्याकडून मिळालेली ही सेवाभावाची प्रेरणा आम्ही दांपत्य पुढे नेत आहोत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असून, भविष्यातही हे सेवाकार्य सातत्याने सुरू राहील,’’ असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अजित दरंदले यांनी सांगितले की, ‘‘मूत्रपिंडातील खडे आणि मूत्रमार्गाशी संबंधित आजारांकडे सुरुवातीच्या टप्प्यातच लक्ष देणे आवश्यक आहे. बदलती जीवनशैली, कमी पाणी पिण्याची सवय, अयोग्य आहार आणि उन्हात जास्त वेळ राहणे यामुळे स्टोनच्या समस्येचे प्रमाण वाढताना दिसते. शरीराला आवश्यक तेवढे पाणी मिळणे हा या आजारांपासून बचावाचा महत्त्वाचा भाग आहे. लघवी करताना जळजळ किंवा त्रास होणे, पाठ अथवा पोट दुखणे, लघवीमध्ये बदल जाणवणे यांसारखी लक्षणे दिसल्यास ती अंगावर न काढता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अनेक शस्त्रक्रिया कमी त्रासदायक आणि अधिक सुरक्षित पद्धतीने करता येतात. त्यामुळे योग्य वेळी निदान व उपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे,’’ असे त्यांनी नमूद केले.

## २० वर्षांपासून बंद असलेली रवंदेसिन्नर बससेवा पुन्हा सुरू; पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**रवंदे –** तब्बल २० वर्षांपासून बंद असलेली रवंदेसिन्नर बससेवा अखेर पुन्हा सुरू होणार असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून या मार्गावरील नागरिकांकडून बससेवा सुरू करण्याची मागणी केली जात होती.

मात्र, हा प्रश्न प्रलंबित राहिला होता. अखेर सामाजिक कार्यकर्ते सुनील दवंगे यांनी पुढाकार घेत मुंबई मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन रवंदेसिन्नर बससेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी केली.

दवंगे यांनी अनेक वेळा मंत्रालयात जाऊन संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून रवंदेसिन्नर बससेवा मंजूर करण्यात आली आहे. सदर बस रवंदे, धामोरी, चासनळी, दहिवडी, उजनी, पांचाळे मार्गे सिन्नर येथे पोहोचणार आहे. बससेवा बंद असल्याने या भागातील विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना सिन्नरकडे जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता तब्बल २० वर्षांनंतर बससेवा पुन्हा सुरू होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, रवंदे ग्रामपंचायतीनेही बससेवा पुन्हा सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते सुनील दवंगे यांच्यासह ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांचेही नागरिकांनी आभार मानले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## शिवप्रहार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी विशाल म्हस्के यांची नियुक्ती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिवप्रहार संघटनेच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यकर्ता व पदाधिकारी मेळाव्यात सामाजिक कार्यकर्ते विशाल म्हस्के यांची शिवप्रहार संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इंजि. संजीव भोर यांच्या हस्ते म्हस्के यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

गोरगरीब, वंचित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणाऱ्या तसेच उद्योग, सामाजिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजावर सकारात्मक ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींचा यावेळी शिवप्रहारच्या वतीने पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिवप्रहार संघटनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात राज्यातील विविध जिल्ह्यांमधील शंभरहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये विशाल म्हस्के यांच्या सामाजिक कार्याची, विविध संघटनांमध्ये केलेल्या कामाची तसेच दांडग्या जनसंपर्काची दखल घेऊन त्यांच्यावर अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

विशाल म्हस्के यांनी यापूर्वी मराठा क्रांती मोर्चा, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कामगार आघाडीसह विविध सामाजिक व संघटनात्मक पदांवर काम केले आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेत जनसामान्यांशी सातत्याने संपर्क ठेवणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.

या नियुक्तीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात शिवप्रहार संघटनेचे संघटनात्मक काम अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, गोरगरीब वंचित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत संघटनेचा विस्तार करण्याचा मानस म्हस्के यांनी व्यक्त केला. यावेळी शंकर धोंडगे, एम. एम. तांबे, मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, राज देशमुख, माणिक डावरे, अमोल पाटील, सुरेश झोंबाडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशाल म्हस्के यांच्या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## देरेवाडीतील महार वतन जमिनींच्या व्यवहारांची चौकशी करा!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मौजे देरेवाडी (ता. नगर) येथील सर्वे क्रमांक ४५, ४६/२, ४७/२, ४८ व ५० या महार वतन अथवा महार इनाम वर्ग–६ जमिनींची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून बेकायदेशीर ठरलेले खरेदी व्यवहार व फेरफार नोंदी रद्द कराव्यात, तसेच कायद्यानुसार पात्र मूळ महार वतनदारांना त्यांच्या जमिनी परत मिळवून द्याव्यात, अशी मागणी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठविण्यात आले असून, शिष्टमंडळाने अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. देरेवाडी येथील महार वतन जमिनींचा इतिहास, जमिनींचे क्षेत्रफळ, संरक्षण खात्याकडे असलेला ताबा तसेच मूळ वतनदारांच्या वारसांच्या हक्काचा प्रश्न याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी शिवसेना सामाजिक न्याय विभाग दक्षिणचे जिल्हाप्रमुख विनोद साळवे, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार संघाचे अहिल्यानगर उपाध्यक्ष दीपक कांबळे, रमेश धोंडीराम भिंगारदिवे, विनायक उबाळे, लता पगारे, लंका भिंगारदिवे, द्वारका पंडित, सुनील भोसले, आदिती शिंदे, विनोद भिंगारदिवे आणि तृप्ती ढगे आदी उपस्थित होते.

निवेदनानुसार, देरेवाडी येथील सर्वे क्रमांक ४५, ४६/२, ४७/२, ४८ व ५० या जमिनी इंग्रजकालीन महार वतन अथवा महार इनाम वर्ग–६ स्वरूपाच्या असून, तत्कालीन महार वतनदारांना त्यांच्या पारंपरिक सेवेसाठी या जमिनी प्रदान करण्यात आल्या होत्या. यापैकी काही जमीन संरक्षण विभागाने संपादित केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र उर्वरित जमिनींच्या मालकी हक्क व व्यवहारांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

# रुग्णसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल विश्वास व श्रद्धेचे केंद्र - सीए अशोक पितळे

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत अस्थिरोग तपासणी शिबिर; १३५ रुग्णांची तपासणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रुग्णसेवेसाठी विश्वास व श्रद्धेचे केंद्र म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलने नावलौकिक मिळवला आहे. प.पू. आनंदऋषीजी महाराजांच्या मानवसेवेच्या कार्याची पायाभरणी प.पू. आदर्शऋषीजी यांनी या हॉस्पिटलच्या उभारणीतून केली. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य समर्पित भावनेने या कार्यात योगदान देत आहेत. रुग्णसेवेचे रोपटे आता वटवृक्षात बहरले असून, अनेक गरजू कुटुंबांना या सेवेच्या सावलीचा आधार मिळाला आहे, अशी भावना सीए अशोक पितळे यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए अशोक धनराज पितळे परिवाराच्या वतीने मोफत अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया तसेच फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सीए अशोक पितळे बोलत होते. यावेळी सौ. निता पितळे, मनीष पितळे, सीए गौरव पितळे, आनंद पितळे, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाइन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. भरत जगताप, डॉ. नितीन कुमार, डॉ. अभय साठे, डॉ. आराधना अखडे आदी उपस्थित होते.

पुढे सीए पितळे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात उद्योग-व्यवसाय सांभाळून अनेक कुटुंबे समर्पित भावनेने रुग्णसेवेशी जोडली गेली आहेत. त्यांची पुढील पिढीदेखील या कार्यात योगदान देत आहे. गरिबांना कमी खर्चात उपचार मिळावेत, हा रुग्णसेवेचा मापदंड घेऊन हॉस्पिटलमध्ये कार्य केले जात आहे. हॉस्पिटलच्या नेत्रालयाने राज्यात सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा मान मिळवला आहे. उपनगरातील नागरिकांसाठी तारकपूर येथेही सेंटर सुरू करण्यात आले असून, त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, शेवटच्या घटकेपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी ही सेवा सुरू झाली आहे. प्रत्येक सदस्य सद्भावनेने या कार्यात सहभाग देत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. रुग्णसेवेचे प.पू. आदर्शऋषीजींचे स्वप्न या हॉस्पिटलच्या माध्यमातून साकारले गेले आहे. मानवसेवेचा विडा उचलून रुग्णसेवा मनोभावे केली जात आहे. यावर्षी नवीन प्रकल्प म्हणून अद्ययावत रोबोटिक सर्जरी उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. कमी खर्चात अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. एमआरआय व इतर तपासण्याही रुग्णांना अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशोक पितळे हे नामवंत सीए असून, त्यांचा परिवार हॉस्पिटलच्या सेवाकार्याशी जोडला गेलेला आहे. मुंबई येथे झालेल्या कॉन्फरन्समध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्र विभागाची प्रामुख्याने दखल घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी मराठी माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया मजबूत करा! – महापौर गाडे

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या पालक-शिक्षक सहविचार सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्राथमिक शिक्षण हे मुलांच्या उज्वल भविष्याचा भक्कम पाया असते. याच टप्प्यावर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, आत्मविश्वास आणि विविध गुण विकसित होत असतात. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असली, तरी मातृभाषेतूनही विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता येते. आज विविध क्षेत्रांत मोठ्या पदांवर कार्यरत असलेले अनेक अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती मराठी माध्यमातूनच घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी राज्य सरकारच्या मोफत शिक्षणाच्या सुविधेचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळा व शिक्षकांना सहकार्य करावे; मात्र मुलांवर अपेक्षांचे अनावश्यक ओझे लादू नये, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयात पालक-शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. यावेळी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे बोलत होत्या.



यावेळी जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, स्कूल कमिटी सदस्य शामराव व्यवहारे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कैलास लोंढे, राजमुद्रा अकॅडमीच्या संचालिका सौ. नंदाताई पांडुळे, इमरान तांबोळी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, माध्यमिकचे प्रभारी मुख्याध्यापक महादेव भद्रे यांच्यासह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी लक्ष्मीबाई व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी पालक-शिक्षक सहविचार सभेत पालकांशी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीपासून ते पोषण आहार, आरोग्य, आहाराच्या सवयी तसेच विविध परीक्षांची तयारी या विषयांवर संवाद साधला. विद्यार्थ्यांची केवळ शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे हा शाळेचा उद्देश नसून त्यांच्या आहार, आरोग्य, शारीरिक व मानसिक विकासाकडेही शाळेच्या माध्यमातून विशेष लक्ष दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने घडविण्यासाठी पालक आणि शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात ज्ञानदेव पांडुळे यांनी रयत शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड केली जात नसल्याचे सांगितले. प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांना घडविण्याचे काम करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यस्तरावर चमकत आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाची आणि शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण कार्याची प्रभावीपणे मांडणी व मार्केटिंग करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# अहिल्यानगरच्या महिला फुटबॉल संघाचा जळगावमध्ये गोलांचा धडाका!

## वर्धा संघाचा १२–१ गोलने उडविला धुव्वा; सुमय्या शेखच्या ७ गोलसह वरिष्ठ महिला संघाची दिमाखदार आगेकूच
## वरिष्ठ महिला राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत विजेतेपदासाठी अहिल्यानगरच्या रणरागिणी सज्ज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेच्या (एडीएफए) वरिष्ठ महिला फुटबॉल संघाने वरिष्ठ महिला आंतरजिल्हा फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये दमदार सुरुवात करत वर्धा जिल्हा संघाचा तब्बल १२-१ गोलने एकहाती पराभव केला. सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी झालेल्या या सामन्यात अहिल्यानगरच्या महिला खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत मैदानावर वर्चस्व राखले. या दणदणीत विजयामुळे अहिल्यानगर संघाने स्पर्धेतील आपली आगेकूच कायम ठेवली आहे.

२१ ते २६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जळगाव येथे या राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षीच्या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघाने उपविजेतेपद (सेकंड रनर्स-अप) मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली होती. यंदा त्या कामगिरीची पुनरावृत्ती न करता थेट विजेतेपदावर नाव कोरण्याचा निर्धार संघातील खेळाडूंनी व्यक्त केला आहे.

वर्धाविरुद्धच्या सामन्यात अहिल्यानगरच्या सुमय्या शेख हिने अक्षरशः गोलचा पाऊस पाडत तब्बल ७ गोल नोंदविले. तिच्या आक्रमक आणि प्रभावी खेळामुळे वर्धा संघाच्या बचावफळीवर मोठा दबाव निर्माण झाला. यानंतर तनिषा शिरसाठ हिनेही शानदार खेळ करत तब्बल



४ गोल केले. निकिता रामावत हिने १ गोल नोंदवत संघाच्या विजयात मोलाची भर घातली. अशा प्रकारे अहिल्यानगरने एकूण १२ गोल करत वर्धा संघावर १२-१ असा दणदणीत विजय मिळविला.

सामन्यात अहिल्यानगरच्या खेळाडूंनी दाखविलेली आक्रमकता, वेगवान पासिंग, उत्कृष्ट सांघिक समन्वय आणि गोल करण्याच्या संधींचे अचूक रूपांतर यामुळे संघाने प्रतिस्पर्धी संघाला सुरुवातीपासूनच बचावात्मक पवित्रा घेण्यास भाग पाडले. मागील वर्षीच्या स्पर्धेत मिळविलेल्या उल्लेखनीय यशानंतर यंदा अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी संघाने तयारी केली आहे. शिस्त, संघभावना, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या जोरावर स्पर्धेत विजेतेपद मिळविण्याचे उद्दिष्ट संघासमोर आहे.

संघाच्या जळगावकडे रवाना होण्याप्रसंगी अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस, समिती सदस्या पल्लवी सैंदाणे, गुलमोहर फुटबॉल क्लबचे सुभाष कानोजिया आणि फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लबचे अभिषेक सोनावणे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी खेळाडू व प्रशिक्षकांना शुभेच्छा देत स्पर्धेसाठी संघाला प्रोत्साहन दिले.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद व अमरजीत सिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, कोषाध्यक्ष रिशपाल सिंग परमार, सहायक कोषाध्यक्ष रणबीर सिंग परमार तसेच समिती सदस्य राजू पाटोळे यांनी अहिल्यानगर जिल्हा वरिष्ठ महिला संघाने पहिल्याच सामन्यात मिळविलेल्या दणदणीत यशाचे अभिनंदन करून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. संघाने शिस्त, संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करून अहिल्यानगर जिल्ह्याचा नावलौकिक उंचवावा, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या राज्य अजिंक्यपद स्पर्धेच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शिबिरादरम्यान गुलमोहर फुटबॉल क्लबने मैदानाच्या सुविधा उपलब्ध करून देत मोलाचे सहकार्य केले.

# दुसऱ्या श्रावण सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात 'अघोरी महाकाल'चा थाटात शृंगार; भाविकांची मोठी गर्दी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५२ वा सोहळा तसेच दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त भगवान महादेवांचा 'अघोरी महाकाल' स्वरूपातील विशेष शृंगार भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या दर्शनाला विशेष महत्त्व असल्याने मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची वर्दळ वाढली होती. 'अघोरी महाकाल' स्वरूपातील आकर्षक शृंगार भाविकांचे विशेष आकर्षण ठरला. या शृंगाराचे दर्शन घेण्यासाठी अहिल्यानगर शहरातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने मंदिरात उपस्थिती लावली.

महाआरतीच्या वेळी मंदिर परिसर हर हर महादेव, बम बम भोलेच्या जयघोषाने दुमदुमून गेला. भक्तिमय वातावरणात विधिवत महाआरती करण्यात आली. महादेवाच्या दर्शनानंतर भाविकांनी मोठ्या श्रद्धेने पूजा-अर्चना करून आशीर्वाद घेतला. विशेष शृंगारामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष नियोजन केले. महाप्रसादाचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला.

हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या कार्यकर्त्यांनी श्रावण सोमवारनिमित्त केलेल्या विशेष नियोजनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आकर्षक शृंगार, महाआरती आणि महाप्रसादाचे उत्तम नियोजन करण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीमुळे संपूर्ण सोहळा भक्तिमय वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्याची परंपरा जपत हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामुळे परिसरातील भाविकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'अघोरी महाकाल' शृंगाराच्या दर्शनाने भाविकांना आध्यात्मिक समाधान मिळाले असून, मंडळाच्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले.

# आशादीप इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये रक्षाबंधन उत्साहात साजरे

## आनंद, स्नेह आणि बंधुभावाच्या वातावरणात विद्यार्थ्यांनी अनुभवला रक्षाबंधनाचा उत्साह



**दैनिक आकर्षण । विशाल लोंढे**

**कोपरगाव–** भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचे, स्नेहाचे आणि विश्वासाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण आशादीप इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसरात रक्षाबंधनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत एकमेकांना राखी बांधत प्रेम, आपुलकी आणि बंधुभावाचा सुंदर संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदाने भारावून गेले होते.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी विशेष खाऊचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करत रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. सणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये परस्पर प्रेम, जिव्हाळा, सहकार्य आणि एकमेकांप्रती आदराची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता. या कार्यक्रमास मॅनेजर फ्र. सतीश कदम, प्राचार्य फ्र. सचिन मुंटोडे, ब्रदर अनंत सोनवणे, प्रकाश नवले मामा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मिस सविता पवार, मिस अमृता ठोकळ, मिस भारती पवार, मिस दिपाली निकम, मिस दिव्या जगताप, मिस अंजली भालेराव, मिस वर्षा पांगवहणे, रितेश बोरावके सर आणि शाहरुख मणियार सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

रक्षाबंधनाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सणाचा आनंद घेण्यासोबतच प्रेम, स्नेह आणि बंधुभावाचे महत्त्व समजले. उत्साहपूर्ण वातावरणात हा रक्षाबंधन सोहळा आनंदात संपन्न झाला.

(पान १ वरून)

## खर्डा पोलिसांच्या कारवाईत ४१ लाखांचा गुटखा जप्त

५१,४१,०४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी राजू मेहबूब शेख (रा. भेंडटाकळी, ता. गेवराई), प्रदीप विष्णू गायकवाड (रा. च-हाटा फाटा, जि. बीड) आणि तुषार नामदेव कुसळकर (रा. बीड) यांच्याविरुद्ध पोकॉ शशिकांत म्हस्के यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेमधील विविध कलमे आणि अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कारवाईत यांचा सहभाग**

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे आणि सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि उज्ज्वलसिंह राजपूत, उपनिरीक्षक अशोक खेडकर, संभाजी शेंडे, गोकुळ इंगवले, रावसाहेब नागरगोजे, शशिकांत म्हस्के व सहकाऱ्यांनी केली.

## आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश

निर्णयातील तपशीलानुसार अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १,३०९.८८ लाख रुपयांचा निधी निश्चित करण्यात आला आहे. या निधीच्या मंजुरीमागे पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. दि. २ जुलै रोजी मदत व पुनर्वसन विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. या बैठकीत आमदार काशिनाथ दाते सरांच्या उपस्थितीत या शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी प्रस्ताव पुढे नेण्यात आला.

त्यानंतर महाराष्ट्र शासनाने दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी निधी मंजूर केला आहे. जून २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी या निधीतून मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

''शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदत मिळवून देणे, हीच आपली भूमिका आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना या निधीचा योग्य लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल,'' असा विश्वासही आमदार दाते सरांनी यावेळी व्यक्त केला. शासन निर्णयानुसार मंजूर निधी प्रणालीद्वारे पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असून कान्हूर पठार आणि पारनेर सर्कलमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी हा निधी संकटाच्या काळातील मोठा दिलासा ठरणार असल्याचे बोलले जात असून, आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मिळालेले हे यश शेतकरी बांधवांसाठी समाधानाची बाब ठरली आहे.

## आश्वासनानंतर पेडगाव ग्रामस्थांचे आमरण उपोषण स्थगित

पेडगाव परिसरातील नागोबा वस्ती, इदगाह वस्ती, अधुरेवाडी क्रमांक २, भवानी माता परिसर आणि शंकरनगर या भागांमध्ये वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या ठिकाणी सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी महावितरणकडे केली आहे. वीजपुरवठ्याअभावी नागरिकांना घरगुती तसेच दैनंदिन कामकाजात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा परिणाम होत असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या भागातील वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवून सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली.

**६२ श्रीगोंदा-पेडगाव रस्त्याचे काम रखडले**

पेडगाव ग्रामस्थांच्या आणखी एका महत्त्वाच्या मागणीमध्ये -६२ श्रीगोंदा-पेडगाव रस्त्याचा समावेश आहे. या रस्त्याचे बंद असलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

श्रीगोंदा-पेडगाव मार्गाचा वापर पेडगावसह परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच वाहनचालक मोठ्या प्रमाणावर करतात. रस्त्याचे काम रखडल्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे रस्त्याचे काम कोणत्याही विलंबाशिवाय पुन्हा सुरू करून ते दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली.

**वारंवार मागण्या करूनही प्रश्न प्रलंबित**

पेडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने या विविध प्रश्नांबाबत संबंधित प्रशासन आणि विभागांकडे वेळोवेळी मागण्या करण्यात आल्या होत्या. मात्र प्रश्न मार्गी न लागल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत होती. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखेर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

आंदोलन सुरू झाल्यानंतर प्रशासनाकडून ग्रामस्थांच्या मागण्यांची दखल घेण्यात आली. संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या आश्वासनानंतर सरपंच इरफान पीरजादे आणि ग्रामस्थांनी आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

**आश्वासनांची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे**

उपोषण स्थगित झाले असले तरी प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. अवैध दारूविक्रीवर ठोस कारवाई, वीजपुरवठ्याचा प्रश्न आणि रस्त्याचे रखडलेले काम या तिन्ही प्रमुख प्रश्नांवर संबंधित विभागांनी वेळेत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

प्रशासनाकडून दिलेल्या आश्वासनानुसार प्रश्न सोडविण्यास विलंब झाल्यास ग्रामस्थ पुन्हा आंदोलनाची भूमिका घेऊ शकतात, असा इशाराही यावेळी देण्यात आला. त्यामुळे पेडगावमधील प्रलंबित प्रश्न प्रत्यक्षात किती लवकर मार्गी लागतात, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

- शाळेच्या ५० मीटर परिसरासह गावातील अवैध गावठी दारूविक्री कायमस्वरूपी बंद करावी.
- अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.
- अवैध दारूविक्रीच्या ठिकाणी तातडीने धाडी टाकून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत.
- नागोबा वस्ती, इदगाह वस्ती, अधुरेवाडी क्र. २, भवानी माता परिसर आणि शंकरनगर येथे सिंगल फेज वीजपुरवठा तातडीने सुरू करावा.
- -६२ श्रीगोंदा-पेडगाव रस्त्याचे बंद असलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे.
- प्रलंबित प्रश्नांवर संबंधित विभागांनी वेळेत कार्यवाही करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा.

यावेळी आमदार राहुल जगताप, ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार, राजेंद्र म्हस्के, माजी उपसभापती हरिदास शिर्के, सरपंच इरफान पीरजादे, सरपंच शिवप्रसाद उबाळे, उपसरपंच विनोद म्हस्के, प्रशांत दरेकर, राजेंद्र जगताप, बापूराव नागवडे, सतीश बोरुडे, पांडुरंग पोटे, ग्रामपंचायत सदस्य तसेच पेडगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनाच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित झाले असले, तरी ग्रामस्थांच्या मागण्यांची प्रत्यक्ष पूर्तता होणे हीच या आंदोलनाची खरी फलश्रुती ठरणार आहे. त्यामुळे संबंधित विभाग प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची कितपत आणि किती वेगाने अंमलबजावणी करतात, याकडे पेडगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.